पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
काळे ज्वेलर्स
9601222777
9615222777
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २४१ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | मंगळवार ०६/१०/२०२६ । पान- ६

सिल्क फेस्टिव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०,
७९०१० ३११५५.

## सायखिंडी फाट्यावर एलसीबीची मोठी कारवाई



### कारमधून गांजासदृश पदार्थ जप्त
### चालक ताब्यात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : संगमनेर शहरात अवैध अमली पदार्थांची वाहतूक करणाऱ्यांविरोधात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने (एलसीबी) मोठी कारवाई केली. नाशिक-पुणे महामार्गावरील सायखिंडी फाट्याजवळ सोमवारी पहाटे पोलिसांनी सापळा रचून एका संशयित कारला अडविले. कारची झडती घेतली असता त्यामध्ये सुगंधी वनस्पतीसदृश तसेच गांजासदृश पदार्थ आढळून आल्याची प्राथमिक माहिती आहे.

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला एका कारमधून अवैध गांजा संगमनेरच्या दिशेने आणला जात असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी सायखिंडी फाट्याजवळ सापळा रचला. संशयित कार येताच पोलिसांनी ती अडवून चालकास ताब्यात घेतले. त्यानंतर कारची झडती घेतली असता त्यामध्ये गांजासदृश पदार्थ आढळून आल्याने पोलिसांनी कारसह संबंधित चालकाला ताब्यात घेत शहर पोलिस ठाण्यात आणले.

(पान ५ वर)

## ‘एसआयआर’विरोधात ठाकरे बंधूंची गर्जना; मविआचे जोरदार शक्तिप्रदर्शन

### निवडणूक आयोगाला सत्तेचे बाहुले बनवल्याचा बाळासाहेब थोरात यांचा घणाघाती आरोप

मुंबई (वृत्तसंस्था)

संविधानिक पदावर असतानाही पक्षपाती भूमिका घेत असल्याचा आरोप करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवावे आणि एसआयआरची (विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण) प्रक्रिया रद्द करावी, या मागणीसाठी रविवारी मुंबईत ठाकरे बंधूंच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीने जोरदार शक्तिप्रदर्शन केले. ‘गर्जना’ मोर्चाच्या माध्यमातून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), मनसे, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), शेकापसह मविआतील घटक पक्षांनी निवडणूक आयोगाविरोधात दंड थोपटला.

मोर्चात उद्धव ठाकरे, राज ठाकरे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड यांच्यासह विविध पक्षांचे नेते मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी केंद्रातील भाजप सरकारसह निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर जोरदार टीका करण्यात आली.

सरन्यायाधीशांना प्रक्रियेतून दूर केल्यापासूनच निवडणूक आयोगाला सत्तेच्या नियंत्रणाखाली आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. आयोग सत्तेच्या नियंत्रणात गेल्यापासून तो पक्षपाती झाला असून सरकारचे बाहुले बनला आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा पराभव होऊ शकत होता का? असा सवाल काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी उपस्थित केला.



निवडणूक आयोगाच्या निर्णय प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत थोरात यांनी लोकशाही व्यवस्थेतील निष्पक्ष निवडणुकांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यामुळे त्यांच्या भाषणातील आयोगाच्या स्वायत्ततेचा मुद्दा हा मोर्चातील प्रमुख चर्चेचा विषय ठरला.

**‘कारभार सुधारला नाही तर हात उचलावा लागेल’ : उद्धव ठाकरे** -शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. हा लढा कोणत्याही जाती-धर्माविरोधात नसून देशाच्या स्वातंत्र्याचा लढा आहे. आता पाऊल उचलले आहे. आयोगाचा कारभार सुधारला नाही, तर हात उचलावा लागेल, असा इशारा ठाकरे यांनी दिला.

निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी आयोगाने पारदर्शक आणि निष्पक्ष भूमिका घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

**‘एसआयआर रद्द करा, मतपत्रिकेवर निवडणुका घ्या’ : राज ठाकरे** - मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही निवडणूक प्रक्रियेवरून सरकार आणि आयोगावर निशाणा साधला. एसआयआर रद्द करून ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेवर निवडणुका घेण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

मतदार वाढवून सत्ता घ्यायची, आपल्या बाजूला मतदार वळवायचे, हे सुरू आहे. सर्व राजकीय पक्षांनी दिल्लीत जाऊन याविरोधात आवाज उठवला पाहिजे. कोणाचीही सत्ता योग्य मार्गानेच यायला हवी, असे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले.

**निवडणूक प्रक्रियेवरून राजकीय वातावरण तापले**- एसआयआरच्या निर्णयासह निवडणूक आयोगातील मतभेद आणि आयोगाच्या कार्यपद्धतीवरून देशभरात विरोधकांकडून आंदोलने सुरू आहेत. निवडणूक आयोगाच्या कार्यकाळात झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये ‘मतचोरी’ झाल्याचा आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी यापूर्वी केला होता. त्याच पार्श्वभूमीवर मविआच्या या मोर्चामुळे महाराष्ट्रातील राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. ठाकरे बंधूंच्या संयुक्त नेतृत्वाखालील या मोर्चातून निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेचा मुद्दा, एसआयआरविरोधातील नाराजी आणि भाजपविरोधातील राजकीय आक्रमकता एकाच व्यासपीठावर आली. त्यामुळे आगामी राजकीय संघर्षाची नांदी म्हणून या शक्तिप्रदर्शनाकडे पाहिले जात आहे.

## संगमनेरच्या सुवर्णकन्येची ऐतिहासिक कामगिरी



सर्वोत्कृष्ट महिला सायकलपटू’चा बहुमान

### प्रणिता सोमणला राष्ट्रीय माउंटेन बाईक चॅम्पियनशिपमध्ये ३ सुवर्ण, १ रौप्य पदक

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ओडिशातील महेंद्रगिरी येथे झालेल्या राष्ट्रीय माउंटेन बाईक चॅम्पियनशिपमध्ये संगमनेरची युवा सायकलपटू प्रणिता सोमण हिने दमदार कामगिरी करत तब्बल ३ सुवर्ण आणि १ रौप्य पदक पटकावले. या शानदार कामगिरीमुळे प्रणिताने महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून तिला स्पर्धेतील ‘सर्वोत्कृष्ट महिला सायकलपटू’ या बहुमानाने गौरविण्यात आले.

प्रतिकूल परिस्थिती, खडतर मार्ग आणि देशभरातील गुणवान सायकलपटूंच्या तगड्या स्पर्धेला सामोरे जात प्रणिताने आपल्या जिद्दीचे आणि कौशल्याचे दर्शन घडविले. तिच्या या ऐतिहासिक कामगिरीने संगमनेरच्या क्रीडा क्षेत्राची मान उंचावली आहे.

प्रणिता सोमण हिने यापूर्वीही अनेक राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्तरावरील अवघड सायकल स्पर्धांमध्ये सहभाग घेत उल्लेखनीय यश मिळविले आहे. विविध स्पर्धांमध्ये तिने अनेक सुवर्णपदकांची कमाई करत आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीची छाप उमटवली आहे. कठोर सराव, प्रचंड मेहनत, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर प्रणिताने राष्ट्रीय स्तरावर स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

प्रणिताची कामगिरी ही केवळ संगमनेरसाठीच नव्हे, तर महाराष्ट्रातील युवा सायकलपटूंसाठीही प्रेरणादायी ठरली आहे. राष्ट्रीय स्पर्धेत तीन सुवर्ण व एका रौप्य पदकासह ‘सर्वोत्कृष्ट महिला सायकलपटू’चा बहुमान मिळविल्याबद्दल प्रणिता सोमण हिचे अभिनंदन होत आहे. तिच्या आगामी वाटचालीसाठी क्रीडाप्रेमी, नागरिक आणि विविध क्षेत्रांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## ॲड. थोरातांची जलतरणात दमदार कामगिरी

## दोन सुवर्ण, दोन रौप्य पदकांची कमाई!

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- जळगाव येथे ३ व ४ ऑक्टोबर रोजी झालेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत संगमनेरचे प्रसिद्ध ॲड. सदाशिवराव थोरात यांनी उल्लेखनीय कामगिरी करत दोन सुवर्ण आणि दोन रौप्य पदके पटकावली. या नेत्रदीपक कामगिरीच्या जोरावर त्यांची बेंगळुरू येथे होणाऱ्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

जळगाव येथे झालेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या विविध भागांतून जलतरणपटूंनी सहभाग घेतला. नागपूर, वर्धा, नांदेड, नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, मुंबई, ठाणे, पालघर, अहिल्यानगर आणि संभाजीनगर आदी जिल्ह्यांमधील सुमारे ५६० स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. अशा मोठ्या स्पर्धेत ड. थोरात यांनी चार पदकांची कमाई करत संगमनेरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला.

बेंगळुरूतील राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



ॲड. थोरात हे केवळ कायदे क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व म्हणून नव्हे, तर उत्कृष्ट जलतरणपटू म्हणूनही परिचित आहेत. त्यांनी यापूर्वी विविध राज्यस्तरीय व राष्ट्रीय जलतरण (पान ५ वर)

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त
ऑफर मिळतेय जबरदस्त !
१०१ भाग्यवंत जोडप्यांना
FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226 | अहिल्यानगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
नियम व अटी लागू
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओम मयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
- अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
- माफक दरात - संगमनेर येथेच
- 105 बेड्स
- तज्ञ डॉक्टर्स
- अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# पेमगिरी शाहगडच्या पर्यटन विकासाला नवी दिशा

## आ. अमोल खताळ यांच्या मागणीला यश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याच्या संकल्पनेला प्रेरणा देणारे छत्रपती शहाजीराजे भोसले यांनी स्वराज्याचा संकल्प केलेल्या व ऐतिहासिक स्मृतींशी जोडलेल्या पेमगिरी (शाहगड) किल्ला परिसराच्या पर्यटन विकासाला आता नवी दिशा मिळणार आहे. महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळामार्फत पेमगिरी येथील निसर्ग पर्यटन विकास आराखड्याला तत्वतः मान्यता मिळाल्याने संगमनेरच्या पर्यटन विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल पुढे पडले आहे.

पेमगिरीचा शाहगड हा केवळ एक ऐतिहासिक किल्ला नाही, तर हिंदवी स्वराज्याच्या संकल्पनेशी जोडलेला प्रेरणादायी ऐतिहासिक वारसा आहे. याच पेमगिरीच्या भूमीतून छत्रपती शहाजीराजांनी हिंदवी स्वराज्याचा संकल्प केला, अशी ऐतिहासिक परंपरा आहे. त्यामुळे या परिसराचा विकास करताना इतिहास, निसर्ग, पर्यटन आणि स्थानिक रोजगार या सर्व बाबींचा समन्वय साधण्याची मोठी संधी निर्माण झाली आहे. पेमगिरी परिसराच्या पर्यटन विकासासाठी गेल्या अनेक वर्षांपासून विविध स्तरांवर प्रयत्न सुरू होते. मात्र हा विषय प्रत्यक्ष विकासाच्या टप्प्यावर नेण्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा आवश्यक होता.आमदार अमोल खताळ पाटील यांनी पेमगिरीच्या पर्यटन विकासाचा विषय शासनाच्या संबंधित विभागां कडे सातत्याने मांडत त्यासाठी पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना आता सकारात्मक प्रतिसाद मिळाला

या निर्णयासाठी महाराष्ट्राचे मुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे .सुनेत्रा पवार, पर्यटन मंत्री शंभूराज वन मंत्री गणेश नाईक तसेच पालकमंत्री मा.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नातून निसर्ग पर्यटन विकास आराखड्याला तत्वतः मान्यता मिळाली आहे. या निधीच्या माध्यमातून पेमगिरी परिसरामध्ये पर्यटकांना आवश्यक असणाऱ्या मूलभूत सुविधा निसर्ग पर्यटनाला पूरक विकास, ऐतिहासिक वारशाचे संवर्धन आणि स्थानिक पातळीवर पर्यटनाशी संबंधित रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाहीला गती मिळण्याची अपेक्षा आहे.

**पेमगिरी शाहगडच्या विकासामुळे संगमनेर तालुक्याच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि पर्यटन क्षेत्राला नवी ओळख मिळण्याची अपेक्षा असून या गडाच्या विकास कामाच्या पुढील अंमलबजावणीकडे संपूर्ण पंचक्रोशीचे लक्ष लागले आहे.आमदार अमोल खताळ पाटील यांच्या या प्रयत्नांचे पेमगिरी, निमगाव बुद्रुक आणि परिसरातील नागरिकांसह शिवप्रेमींकडून स्वागत व कौतुक होत आहे.**

**आशिष कानवडे**
**संस्थापक,**
**धर्मनाद प्रतिष्ठान, संगमनेर**

# पेसा कर्मचाऱ्यांचे बेमुदत उपोषण स्थगित

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायत अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी यांच्या मागण्यांबाबत पंचायत समितीसमोर मागील १७ दिवसांपासून सुरू असलेले बेमुदत उपोषण जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिलेल्या आश्वासनानंतर रविवारी स्थगित करण्यात आले. इतर बारा जिल्ह्यांप्रमाणे अहिल्यानगर जिल्ह्यात कार्यवाही व्हावी आणि आंदोलकांचे गुन्हे मागे घेण्याबाबतची प्रक्रिया सुरू करण्याची ग्वाही त्यांनी उपोषणकर्त्यांना दिली.



अकोले पंचायत समिती कार्यालयासमोर मागील सतरा दिवसांपासून पेसाअंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांनी उपोषण सुरू केले होते. कार्यरत व कार्यमुक्त असलेल्या पेसा मानधनावरील कर्मचाऱ्यांना त्याच पदावर, त्याच जागी तात्काळ सेवेत सामावून घ्यावे, आंदोलनातील गुन्हे मागे घ्यावेत, सर्व पेसा मानधन कर्मचाऱ्यांची अद्यापपर्यंतची सेवा कायम करावी, या मागण्यांसाठी अक्षय बांबळे, प्रवीण सुकटे, नवनाथ सुकटे, प्रणिता आंबेकर, अश्विनी डगळे, मनीषा बांबेरे, विद्या गोडे यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांनी उपोषण सुरू केले होते. मंत्री डॉ. विखे-पाटील, माजी आमदार वैभवराव पिचड, अगस्ती कारखान्याच्या व्हाईस चेअरमन सुनीताताई भांगरे यांच्यासह महसूल, पोलीस आणि जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उपोषणस्थळी जाऊन उपोषणकर्त्यांशी चर्चा केली.

जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी यासंदर्भात प्रशासनाची भूमिका मंत्री विखे-पाटील यांच्यापुढे मांडली. इतर बारा जिल्ह्यांप्रमाणे अहिल्यानगर जिल्ह्यात कार्यवाही करण्याबाबत धोरण असेल तर त्याची अंमलबजावणी तातडीने करण्याच्या सूचना त्यांनी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांना दिल्या. आदेशातील जाचक अटी काढून टाकणे तसेच आंदोलनातील गुन्हे मागे घेण्याबाबत सरकार सकारात्मक निर्णय करेल अशी ग्वाही दिल्यानंतर उपोषणकर्त्यांनी आपले आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला. पं. समितीच्या दारासमोर सतरा दिवस आंदोलन सुरू असतानाही तहसीलदार, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी त्याची दखल न घेतल्याबद्दल मंत्री विखे-पाटील यांनी आश्चर्य व्यक्त केले.

आंदोलनकर्त्यांनीही हीच बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली.

# तलावात बुडून तरुणाचा मृत्यू

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - तालुक्यातील ब्राह्मणवाडा हद्दीत वनकुटे रोडलगत इसापूर तलावाजवळ सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम करणाऱ्या परराज्यातील एका २० वर्षीय तरुणाचा तलावात बुडून मृत्यू झाला. ही घटना २ ऑक्टोबर रोजी सकाळी घडली असून या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

उत्तर प्रदेशातील दहा कर्मचारी सौर ऊर्जा प्रकल्पाच्या कामासाठी ब्राह्मणवाडा परिसरात आले आहेत. हे सर्वजण इसापूर तलावाजवळील परिसरात कामकाज करत होते. २ ऑक्टोबर रोजी सकाळच्या सुमारास हे दहाही कर्मचारी आंघोळ करण्यासाठी इसापूर तलावात गेले होते. आंघोळ करत असताना प्रतीम विजयपाल यादव (वय २०) याला अचानक पाण्यात दम लागल्याने तो बुडू लागला. सोबत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्याला वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मात्र, त्यांचे प्रयत्न अपुरे पडले आणि पाण्यात बुडून प्रतीमचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच अकोले पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह पाण्यातून बाहेर काढून पुढील वैद्यकीय प्रक्रियेसाठी पाठविण्यात आला. या घटनेबाबत पोलिसांनी मृत प्रतीमच्या सहकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली असून घटनेची नोंद केली आहे. पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल घोडे, पोलीस हवालदार बापूसाहेब देशमुख, पोलीस अंमलदार सुहास गोरे आणि जयराम टिकेकर यांच्यासह पोलिसांचे पथक या प्रकरणाचा पुढील तपास करत आहे.

# अवैध वाळू वाहतूकीवर पोलिसांचा छापा; जेसीबीसह डंपर जप्त

## दोघांवर गुन्हा दाखल; २० लाखांचा मुद्देमाल ताब्यात

युवावार्ता (प्रतिनिधी)

कोपरगाव - कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मायगाव देवी शिवारात अवैध वाळू वाहतुकीवर अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर यांच्या पथकाने कारवाई केली. या कारवाईत जेसीबी व डंपरसह २० लाख ३० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या आदेशानुसार ३ ऑक्टोबर रोजी पथक पेट्रोलिंग करीत असताना मायगाव देवी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर अवैध वाळू वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने पंचांसह छापा टाकला.

यावेळी जेसीबी चालक किशोर देवीदास धोत्रे (वय २६, रा. मायगाव देवी) आणि डंपर चालक सुरेश सुकदेव सोनवणे (वय ३८, रा. शिंगणापूर) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे वाळू वाहतुकीचा कोणताही वैध परवाना नसल्याचे आढळून आले. गोदावरी नदीपात्रातून वाळू आणून साठा केल्याचे त्यांनी सांगितले.

पोलिसांनी जेसीबी, डंपर आणि सुमारे ६ ब्रास वाळूसह एकूण २० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

कारवाईत अपर पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसह कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार युवराज खुळे यांनी सहभाग घेतला.

# फरार आरोपीस न्यायालयासमोर हजर राहण्याचे आदेश

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश , अहमदनगर यांनी आरोपी मोहन सुरेश लष्करे रा. गंगानगर नेवासा ता. नेवासा हा न्यायालयीन प्रकरणात वारंवार गैरहजर राहत असल्याने सदर आरोपीस न्यायालयासमोर हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. याबाबत न्यायालयाने बी.एन.एस.एस. २०२३ चे कलम ३५६(२)(ii) अन्वये जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे.

याबाबतच्या नोटीसमध्ये नमूद केल्यानुसार, आरोपी मोहन सुरेश लष्करे, रा. गंगानगर, नेवासा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर हा सदर प्रकरणाच्या कार्यवाहीदरम्यान न्यायालयात गैरहजर राहिला आहे. त्याच्याविरुद्ध वेळोवेळी अजामीनपात्र वॉरंट काढण्यात आले होते. मात्र, संबंधित आरोपी न्यायालयासमोर हजर झाला नाही. त्यानंतर आरोपीस न्यायालयात हजर राहण्याबाबत जाहीरनामा काढण्यात आला. जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतरही आरोपी न्यायालयासमोर हजर न झाल्याने, सदर आरोपीस खटल्यासमोर हजर करण्यासाठी फरार घोषित करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

त्यानुसार बी.एन.एस.एस. २०२३ च्या कलम ३५६(२)(ii) अन्वये जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. या नोटीसमधून आरोपी मोहन सुरेश लष्करे यास नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सदर प्रकरणाच्या सुनावणीसाठी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांच्या न्यायालयासमोर स्वतः हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

निर्धारित ३० दिवसांच्या कालावधीत आरोपी न्यायालयासमोर हजर राहिला नाही, तर त्याच्या अनुपस्थितीत सदर खटल्याची सुनावणी / चौकशी पुढे चालविण्यात येईल, याची आरोपीने नोंद घ्यावी, असेही नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. ही जाहीर नोटीस आरोपीच्या शेवटच्या ज्ञात निवासस्थानाच्या ठिकाणी प्रसिद्ध होणाऱ्या स्थानिक दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच, आरोपीच्या नातेवाईकांना व मित्रांना सदर खटल्याची कार्यवाही आरोपीच्या अनुपस्थितीत सुरू होणार असल्याबाबत माहिती देण्यात येत असल्याचे सदरच्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# विद्यार्थी पुणे बंद करतील, मुंबईत मंत्रालयावर धडकतील

## रोहीत पवारांचा सरकारला 2 दिवसांचा अल्टीमेटम

पुणे (वृत्तसंस्था)

पुण्यातील एमपीएससीच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा आज पाचवा दिवस आहे. आंदोलनात विविध मागण्यांमुळे तीन गट पडलेत. मात्र एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचं आंदोलन की राजकीय आखाडा? अशी स्थिती निर्माण झाली आहे. हर्षवर्धन सपकाळांपासून ते संजय राऊतांपर्यंत अनेक पक्षांच्या नेत्यांनी आंदोलकांची भेट घेतली. स्वत: शरद पवारांनीही या आंदोलनात लक्ष घातलेलं आहे. आता आज दुपारी ४ वाजता मनसे प्रमुख राज ठाकरे एमपीएससीच्या विद्यार्थ्यांची भेट घेणार आहेत. तसेच मनोज जरांगे पाटील हे देखील या आंदोलनाला भेट देणार आहेत. याचदरम्यान, एमपीएससीच्या आंदोलनात पहिल्या दिवसांपासून सहभागी असलेले शरद पवार गटाचे रोहित पवार यांनी राज्य सरकारला इशारा दिला आहे.



सीजेपीचे अभिजीत दिपके यांनी आवाहन केल्याप्रमाणे पुणे शहर ठप्प होऊ शकतं. आता हे एमपीएससीचे विद्यार्थी आणि त्यांचे पालक ठरवतील. त्यावेळी पुणेकरांनी या विध्यार्थ्यांना पाठिंबा द्यावा. ७ किंवा ८ ऑक्टोबरला राहुल गांधी येण्याची शक्यता आहे. त्यादिवशी १ लाख विद्यार्थी पुण्यात रस्त्यावर असतील, असा आमचा अंदाज आहे. एक तर हे विद्यार्थी पुणे बंद करतील किंवा मुंबईत मंत्रालयावर धडकतील, असं रोहित पवार म्हणाले. आज राज ठाकरे, आदित्य ठाकरे आंदोलनात येणार आहेत. सरकारला दोन दिवसांचा अल्टीमेटम देतोय, असा इशाराही रोहित पवारांनी एबीपी माझाशी बोलताना दिलारोहित पवारांनीही चर्चेची भूमिका घ्यावी. ते विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर लढतात. त्यांनी आंदोलन करावं, पण विद्यार्थ्यांना वेठीस धरू नये, असं आवाहन नितेश राणे यांनी केलं होतं. तसेच हा राजकारणाचा मंच नाही, विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे.

# मतदारांच्या कागदपत्रांची तपासणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ अंतर्गत सध्याच्या टप्प्यात अनमॅप व अनोमली असलेल्या मतदारांना नोटीस बजावून त्यांच्याकडून आवश्यक कागदपत्रे जमा करून घेण्याचे काम सुरू आहे.

अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघ क्रमांक २२५ मध्ये अनोमली व अनमॅप मतदारांची संख्या ४४ हजार ७४ आहे. संबंधित सर्व मतदारांशी प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांच्या कागदपत्रांची पूर्तता करून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार मतदान केंद्रस्तरीय अधिकारी संबंधित मतदारांच्या घरी भेट देऊन आवश्यक कागदपत्रे प्राप्त करून घेत आहेत. काही कारणांमुळे संबंधित मतदार घरी आढळून येत नसतील अथवा BLO यांचा त्यांच्याशी संपर्क होऊ शकत नसेल अशा मतदारांना कागदपत्रे जमा करण्यासाठी 'महासैनिक लॉन', जुने जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, अहिल्यानगर येथे 'मतदार मदत कक्ष' स्थापन करण्यात आला आहे. संबंधित मतदारांना प्राप्त झालेल्या नोटीसमध्ये नमूद दिनांकानुसार महासैनिक लॉन येथील मतदार मदत कक्षात उपस्थित राहून आपली आवश्यक कागदपत्रे जमा करता येतील. त्यामुळे SIR अंतर्गत नोटीस प्राप्त झालेल्या मतदारांनी वेळेत कागदपत्रांची पूर्तता करून प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी सुधीर पाटील यांनी केले आहे.

# पेन्शनधारकांसाठी 'महा-उपलब्धी' कार्यशाळा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- जिल्हा कोषागार कार्यालय, अहिल्यानगरच्या अधिनस्त सर्व निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी शासनाच्या 'महा-उपलब्धी' मोबाईल ॲपबाबत जनजागृती करण्यासाठी मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा कोषागार कार्यालय, अहिल्यानगर येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

वित्त विभागाच्या शासन निर्णय अन्वये निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी दि. १ जुलै २०२६ पासून 'महा-उपलब्धी' हे मोबाईल ॲप कार्यान्वित करण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून निवृत्तीवेतनाशी संबंधित विविध सेवा जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या ॲपचा वापर, उपलब्ध सेवा तसेच निवृत्तीवेतनधारकांना त्याचा होणारा उपयोग याबाबत माहिती देण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे. जिल्ह्यातील निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतनधारक तसेच पेन्शनर्स संघटनांच्या प्रतिनिधींनी या कार्यशाळेस उपस्थित रहावे.

# मोबाईल मित्रही, शत्रूही; वापर जपून करा : पीआय साळुंके

## सायबर सुरक्षा सप्ताहानिमित्त भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री विद्यालयात जनजागृतीचे व्याख्यान

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सायबर सुरक्षा आणि जनजागृती सप्ताहानिमित्त लायन्स क्लब ऑफ संगमनेर व संगमनेर तालुका पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री विद्यालयात 'सायबर सुरक्षा व विद्यार्थी' या विषयावर जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मोबाईलचा योग्य वापर, सायबर गुन्ह्यांपासून बचाव आणि सोशल मीडियाच्या वापराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक लायन्स क्लब ऑफ संगमनेरचे अध्यक्ष ड. उदयकुमार ढोमसे यांनी केले. आजच्या युगात बहुतांश विद्यार्थ्यांच्या घरी मोबाईल उपलब्ध आहे. त्याचा योग्य तसेच अयोग्य वापरही होत असतो. मोबाईलचा योग्य वापर कसा करावा, त्याचे फायदे काय आहेत आणि अयोग्य वापराचे दुष्परिणाम कोणते आहेत, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जाणीव व जनजागृती निर्माण करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. संगमनेर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक



प्रवीणकुमार साळुंके यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, मोबाईल हे एक साधन आहे; त्याचा वापर कसा करायचा हे आपल्या हातात आहे. मोबाईल मित्रही ठरू शकतो आणि शत्रूही. त्यामुळे त्याचा वापर अत्यंत जपून आणि योग्य पद्धतीने करा.

विद्यार्थ्यांनी जीवनात स्वयंशिस्त निर्माण करावी, वेळेचे व जीवनाचे व्यवस्थापन करावे आणि सद्गुण व सत्कार्याचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन त्यांनी केले. मोबाईलचा अतिवापर हे एक प्रकारचे व्यसन असून, विद्यार्थ्यांनी त्याचा वापर प्रामुख्याने अभ्यासासाठी व ज्ञान मिळविण्यासाठी करावा. जगातील चांगल्या गोष्टी आत्मसात करून स्वतःची आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करावा, असेही त्यांनी सांगितले.

शालेय जीवनात संघर्ष करून, कष्ट व मेहनत करून यश संपादन करा. यशस्वी व्यक्तींची चरित्रे व आत्मचरित्रे वाचा. महापुरुषांचे कार्य जाणून घ्या. तुम्हाला भविष्यात तुमच्या आयुष्याची इमारत भक्कमपणे उभी करायची असेल, तर आजच तिचा पाया मजबूत करा, असे साळुंके यांनी सांगितले. सायबर जगतातील चुकीच्या वापरामुळे अनेक जण अनावधानाने सायबर गुन्ह्यांमध्ये अडकतात. एखाद्या चुकीच्या कृतीमुळे सायबर गुन्ह्यात अडकल्यास त्यातून बाहेर पडणे सहज शक्य होत नाही. त्यामुळे सोशल मीडिया, अनोळखी लिंक, संदेश आणि मोबाईलवरील विविध ॲप्सचा वापर करताना विशेष काळजी घ्यावी, असा संदेश त्यांनी दिला.

मित्र-मैत्रिणी चुकीच्या मार्गावर जात असल्यास त्यांना समजावून सांगावे. त्यांच्यात बदल होत नसेल तर शिक्षक किंवा पालकांच्या निदर्शनास ही बाब आणावी. भविष्यात देशाचे प्रशासन, उद्योग, वैद्यकीय, कायदा व विविध क्षेत्रांची जबाबदारी विद्यार्थ्यांवर येणार आहे. त्यामुळे आजपासूनच चांगल्या सवयी, संस्कार आणि शिस्त अंगीकारा, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी अडचणी आल्यास संयमाने त्यांचा सामना करावा. चुकीच्या मार्गाला न जाता शिक्षण, संस्कार आणि मेहनतीच्या जोरावर जीवनात यशस्वी व्हावे. मुला-मुलींना कोणतीही अडचण किंवा आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास ११२ क्रमांकावर संपर्क साधावा, तात्काळ पोलीस मदत मिळू शकते, अशी माहितीही त्यांनी दिली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते व माजी लायन्स क्लब अध्यक्ष डॉ. ठाकूर, विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. एम. खेमनर, उपमुख्याध्यापिका सौ. दिघे, परीक्षक सर, ज्येष्ठ शिक्षक उमेश नेहे, रवींद्र अभंग, मिलिंद औटी, गिताराम शेळके, घोरपडे मॅडम यांच्यासह विद्यालयातील शिक्षक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# संगमनेरमध्ये पहिली महाराष्ट्र राज्य जंप रोप स्पर्धा उत्साहात

## नागपूर संघाने पटकविले विजेतेपद; बुलढाणा द्वितीय तर अहिल्यानगर संघ तृतीय



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- जंप रोप स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र यांच्या वतीने आणि इंडियन जंप रोप फेडरेशनच्या (खगठऋ) संलग्नतेने आयोजित करण्यात आलेली पहिली महाराष्ट्र राज्य जंप रोप स्पर्धा २०२६ संगमनेर येथे उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडली. राज्यातील विविध जिल्ह्यांमधून आलेल्या २०० हून अधिक खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेत आपल्या क्रीडा कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन केले.

नागपूर, बुलढाणा, अहिल्यानगर, कोल्हापूर, सोलापूर, सातारा यांसह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. स्पीड स्प्रिंट, डबल अंडर, एन्ड्युरन्स, वन लेग स्विच तसेच विविध सांघिक प्रकारांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली. वेग, चपळता, समन्वय आणि शारीरिक तंदुरुस्तीचा कस लावणाऱ्या या स्पर्धेला खेळाडू आणि प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

स्पर्धेतील सर्व प्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत नागपूर संघाने प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपदावर आपले नाव कोरले. बुलढाणा संघाने द्वितीय क्रमांक मिळविला, तर अहिल्यानगर संघाने तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास संगमनेर प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. राजेंद्र लड्डा, ध्रुव ग्लोबल स्कूलच्या प्राचार्य संध्या मॅडम, संगमनेर कॉलेजचे प्राचार्य प्रा. अरुण गायकवाड, भारतीय जंप रोप असोसिएशनचे उपाध्यक्ष गिरीश टोकसे, महाराष्ट्र जंप रोप असोसिएशनचे अध्यक्ष ज्ञानेश्वर भोत, सचिव कुलदीप कागडे, संगमनेर कॉलेजचे फिजिकल डायरेक्टर प्रा. अजित कदम तसेच संगमनेर प्रसारक संस्थेचे उएज रुपेश वालझाडे यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

मान्यवरांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना व संघांना पदके, प्रमाणपत्रे आणि पारितोषिके प्रदान करण्यात आली. यावेळी मान्यवरांनी खेळाडूंचे अभिनंदन करत जंप रोप या क्रीडा प्रकाराच्या विकासासाठी तसेच खेळाडूंना राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याची गरज व्यक्त केली. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामध्ये तांत्रिक टीमने महत्त्वाची भूमिका बजावली. प्रशांत भंडारी, आशिष देशपांडे, शर्वरी, अंशिका, सौम्या, प्राची आणि आयशा यांनी स्पर्धेच्या नियोजनापासून तांत्रिक व्यवस्थापनापर्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले. तसेच कुलदीप कागडे यांनी स्पर्धेसाठी हॉल, भोजन तसेच आवश्यक सोयी-सुविधांची व्यवस्था आणि समन्वय साधण्यासाठी विशेष मेहनत घेतली. त्यांच्या सक्रिय सहकार्यामुळे स्पर्धेचे आयोजन नियोजनबद्ध आणि सुरळीतपणे पार पडले.

# ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विश्वनाथ कलंत्री यांचे निधन

## माहेश्वरी समाजाच्या सामाजिक कार्यातील आधारवड हरपला

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा माहेश्वरी समाजाचे सरपंच विश्वनाथ रामबिलास कलंत्री (वय ८७) यांचे रविवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने माहेश्वरी समाजासह संगमनेर शहरातील सामाजिक, व्यापारी व विविध क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

विश्वनाथ कलंत्री यांनी आपल्या प्रदीर्घ सामाजिक वाटचालीत समाजाच्या एकोप्यासाठी आणि सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी सातत्याने योगदान दिले. साधेपणा, प्रेमळ स्वभाव आणि सर्वांशी आपुलकीने वागण्याच्या वृत्तीमुळे त्यांनी



समाजात आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. समाजातील अनेकांच्या सुख-दुःखात ते नेहमीच सहभागी होत असल्याने त्यांच्याशी जुळलेले जिव्हाळ्याचे नाते अनेकांच्या आठवणीत कायम राहणार आहे.

ते महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सचे संचालक प्रकाश कलंत्री आणि कापड विक्रेते प्रदीप कलंत्री यांचे वडील, तर नगरसेवक शैलेश कलंत्री यांचे काका होत. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक व मोठा आप्तपरिवार आहे. विश्वनाथ कलंत्री यांच्या निधनाने कलंत्री कुटुंबावर तसेच माहेश्वरी समाजावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या प्रेमळ स्वभावाच्या, सामाजिक योगदानाच्या आणि मार्गदर्शक व्यक्तिमत्त्वाच्या आठवणींना उजाळा देत अनेकांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. एक प्रेमळ, मनमिळावू आणि सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेल्याने संगमनेर शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

# न्यायालयाच्या भूमिकेवरून राजकीय वातावरण तापले

नवी दिल्ली (वत्तसंस्था)

कॉकरोच जनता पार्टीने सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेवरच गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. देशातील तरुणांना त्यांच्या मतदानाच्या मूलभूत हक्कापासून वंचित ठेवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने संगनमत केल्याचा आरोप सीजेपीचे पदाधिकारी सौरभ दास यांनी रविवारी केला. आपल्या या गंभीर आरोपादरम्यान त्यांनी थेट दोन न्यायाधीशांच्या नावांचाही उल्लेख केला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या निलंबनाची मागणी करणाऱ्या आणि निवडणूक आयोगाच्या एकूण कार्यपद्धतीला थेट आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडणार आहे. ही महत्त्वाची सुनावणी तोंडावर असतानाच, अवघ्या काही दिवस आधी सौरभ दास यांनी केलेल्या या विधानामुळे मोठी खळबळ उडाली आहे.सौरभ दास यांनी लिहिले, ज्या न्यायाधीशांनी बंगाल आणि बिहारमधील एसआयआर प्रक्रियेला कोणत्याही अडथळ्याशिवाय पुढे जाऊ दिले ते भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची, यांनी आता गप्प राहावे. त्यांना आता काही करायचे असेल, तर ते करू शकतात. कोणालाही पर्वा नाही. 'Gen-Z'चे मतदानाचे हक्क आणि राज्य निवडणुका काढून घेण्याच्या कटात सर्वोच्च न्यायालय सामील होते, असा आरोप त्यांनी केला.याचिकेवरून उपस्थित केले प्रश्नहे सुनिश्चित करण्यासाठी, महत्त्वाच्या याचिकांवर वेळेवर सुनावणी झाली नाही. यामध्ये महाराष्ट्र सरकारचे पडणे, पक्षांमधील फूट आणि दिल्लीतील घटनात्मक पेचप्रसंग यांचा समावेश आहे. या सर्वांमध्ये भाजपने आपलेच वर्चस्व निर्माण केले. हा आपल्या न्यायव्यवस्थेवर एक मोठा डाग आहे, असा आरोप त्यांनी केला. अशा परिस्थितीत, सर्वोच्च न्यायालयाचे खंडपीठ काहीही करो, ते लोकांच्या नजरेत आपली विश्वासार्हता गमावेल, असेही दास यांनी म्हटले. सौरभ दास म्हणाले, भारतातील जनता आणि तरुण पिढी ठरवेल की काय विश्वसनीय आहे. न्यायालय उद्या किंवा केव्हाही जे हवे ते करू शकते.ड़ आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसोमवारी म्हणजेच आज सर्वोच्च न्यायालय दोन याचिकांवर सुनावणी घेणार आहे, यामध्ये ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीशी संबंधित एका याचिकेचा समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना या प्रकरणाची सुनावणी करतील.

# ग्रामीण भागातून चित्रपटसृष्टीत भरारी

## राज बागुल यांच्या 'मामा'ची राष्ट्रीय शॉर्ट फिल्म फेस्टिव्हलसाठी निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)

पिंपरणे - ग्रामीण भागात राहूनही जिद्द, मेहनत आणि प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर मोठी स्वप्ने साकारता येतात, हे संगमनेर तालुक्यातील पिंपरणे गावचे सुपुत्र राज बागुल यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास तमाशाच्या फडापासून अभिनय आणि आता चित्रपट निर्मितीपर्यंत पोहोचला आहे. त्यांच्या निर्मितीतील 'मामा' या लघुपटाची शिवप्रहार यांच्या अंतर्गत आयोजित नॅशनल शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल २०२६ साठी निवड झाली आहे. त्यामुळे पिंपरणे गावासह संगमनेर तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला.

राज बागुल यांना बालपणापासूनच अभिनय आणि मनोरंजन क्षेत्राची विशेष आवड होती. गावातील मुलांना एकत्र करून त्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि नाट्यप्रयोग सादर केले. याच आवडीतून त्यांनी पुढे लोककलेच्या क्षेत्रात पाऊल ठेवत तमाशा क्षेत्रात काम करण्याचा निर्णय घेतला. नांदूर-शिंगोटे येथे आम्रपाली पुणेकर यांच्या सहकार्याने 'राज बागुल पिंपरणेकर तमाशा मंडळा'ची स्थापना करून त्यांनी लोककलेच्या माध्यमातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

पिंपरणे ही जन्मभूमी असलेल्या राज बागुल यांनी नांदूर-शिंगोटे परिसराला आपली कर्मभूमी बनवली. उत्कृष्ट सादरीकरण आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर त्यांनी तमाशा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांना पठ्ठे बापूराव पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार यासह विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले. तमाशाच्या फडात काम करत असतानाच त्यांनी विविध मालिका आणि चित्रपटांमध्ये अभिनय केला. अभिनयाच्या अनुभवातून चित्रपट निर्मितीची बारकावे आत्मसात करत त्यांनी स्वतः निर्माता होण्याचा निर्धार केला. त्यातूनच 'अमरराज फिल्म प्रोडक्शन' या बॅनरखाली 'मामा' या लघुपटाची निर्मिती करण्यात आली.



'मामा' या लघुपटाची कथा 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या पार्श्वभूमीवर साकारण्यात आली आहे. या योजनेमुळे महिलांच्या जीवनात झालेले सकारात्मक बदल, त्यांच्या आयुष्याला मिळालेली नवी दिशा तसेच कुटुंब आणि समाजावर होणारा परिणाम या सामाजिक विषयाला लघुपटाच्या माध्यमातून स्पर्श करण्यात आला आहे.

या लघुपटाचे संपूर्ण चित्रीकरण नांदूर-शिंगोटे, मऱ्हळ, सिन्नर आणि संगमनेर परिसरात करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील वास्तव जीवनाशी जोडलेली कथा आणि सामाजिक आशय यामुळे हा लघुपट विशेष ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. लघुपटाचे निर्माते गजानन गांडेकर, तर सहनिर्माते राज बागुल आणि ज्ञानेश्वर म्हस्के आहेत. लेखक-दिग्दर्शक विकेश कमल, डीओपी अभिजीत भालेराव यांच्यासह अॅड. बी. आर. गांडोळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण तांत्रिक टीमने लघुपटासाठी विशेष परिश्रम घेतले आहेत.

लघुपटाची राष्ट्रीय शॉर्ट फिल्म फेस्टिव्हलसाठी निवड झाल्याने राज बागुल यांच्या पुढील चित्रपट प्रवासाला नवी दिशा मिळाली आहे. लवकरच मान्यवरांच्या उपस्थितीत 'मामा' या लघुपटाचे लोकार्पण होणार असून, त्याच्या प्रदर्शनाकडे चित्रपटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# 'प्रारण' चित्रपटाच्या माध्यमातून चिखलीत मोबाईलच्या अतिवापराबाबत जनजागृती

युवावार्ता (प्रतिनिधी)

चिखली- लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत वाढत चाललेल्या मोबाईलच्या अतिवापराबाबत जनजागृती करून त्याचे शैक्षणिक, मानसिक व शारीरिक दुष्परिणाम समाजासमोर मांडणारा 'प्रारण' हा प्रबोधनात्मक शैक्षणिक चित्रपट गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी चिखली येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर प्रदर्शित करण्यात आला. या चित्रपटाला चिखली व पंचक्रोशीतील पालक, विद्यार्थी, तरुण, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




आजच्या डिजिटल युगात लहान वयापासूनच मुलांमध्ये मोबाईलचा वाढता वापर ही गंभीर सामाजिक समस्या बनत आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांच्या अभ्यासावर होणारा परिणाम, एकाग्रतेचा अभाव, मानसिक ताण तसेच शारीरिक आरोग्यावर होणारे विविध परिणाम यांचे प्रभावी चित्रण 'प्रारण' या चित्रपटातून करण्यात आले आहे. मोबाईलचा योग्य वापर कसा करावा, मुलांनी कोणती काळजी घ्यावी आणि पालकांची भूमिका काय असावी, याबाबतही चित्रपटातून प्रभावी संदेश देण्यात आला आहे. मयूर परदेशी यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटात संगमनेर व परिसरातील अनेक नामवंत कलाकारांनी विविध भूमिका साकारल्या आहेत. संगमनेरचे छत्रपती शिवरायांची भूमिका साकारणारे डॉ. सागर फापाळे, तळेगाव येथील डॉ. नंदकिशोर गोडगे, तसेच ढमाले साहेब, राजनजी झांबरे, तापडिया साहेब, भोसले साहेब यांच्यासह अनेक कलाकारांनी चित्रपटात उल्लेखनीय भूमिका साकारल्या आहेत. या प्रबोधनात्मक उपक्रमासाठी स्वर्गीय डॉ. एजाज शेख, तसेच डॉ. सुभाष मंडलिक, डॉ. प्रभाकर खरडे यांच्यासह अनेक मान्यवरांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. जनजागृतीचा हा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने 'प्रारण' चित्रपट विविध ठिकाणी प्रदर्शित केला जात आहे.

चिखली येथे या चित्रपटाचे प्रदर्शन घडवून आणण्यासाठी गावातील सर्वपक्षिय युवा वर्ग, युवा उद्योजक आणि ग्रामस्थांनी पुढाकार घेत लोकवर्गणीतून हा सामाजिक उपक्रम यशस्वी केला. कोणत्याही वैयक्तिक स्वार्थाशिवाय मुलांच्या भवितव्याचा विचार करून चिखलीतील तरुणांनी घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असल्याची भावना यावेळी अनेक मान्यवरांनी व्यक्त केली. कार्यक्रमास मालपाणी उद्योग समूहाचे संचालक गिरीशभाऊ मालपाणी तसेच लायन्स क्लब सॅफ्रॉन सफायरचे अध्यक्ष जितेश लोढा सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कलेक्टर हायस्कूल चिखली व जिल्हा परिषद शाळा चिखली येथील शिक्षक, प्राचार्य व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच चिखलीतील विविध सामाजिक संस्था, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, पालक आणि चिमुकल्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून चित्रपटाचा लाभ घेतला.

मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोबाईलच्या अतिवापराबाबत जागरूकता निर्माण करणे ही आजची गरज आहे. चिखलीच्या युवा वर्गाने लोकसहभागातून उचललेले हे पाऊल निश्चितच सामाजिक परिवर्तनाची सुरुवात ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. चिखली ग्रामस्थ व युवा वर्गाच्या या उपक्रमातून 'विचार बदलूया आयुष्य घडवूया' हा संदेश प्रत्यक्षात उतरविण्याचा प्रयत्न झाला असून, मुलांच्या भवितव्यासाठी चिखलीने उचललेले हे पाऊल निश्चितच प्रेरणादायी ठरले आहे.

# महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांचे जयंतीनिमित्त साकुर जिल्हा परिषद शाळेत विविध स्पर्धांचे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

साकूर - राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५७ वी जयंती ,आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन तसेच माजी पंतप्रधान लालबहादुरशास्त्री यांच्या जयंतीनिमित जय हिंद लोकचळवळीचे नाशिक जिल्हा समन्वयक ,सामाजिक कार्यकर्ते मिलिंद कुकडे यांच्या संकल्पनेतून साकुर तालुका इगतपुरी गावातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत ३ दिवस जयहिंद लोकचळवळीच्या माध्यमातून वक्तृत्व,निबंध, चित्रकला स्पर्धांचे आयोजन केले गेले.इयत्ता १ ली ते ४ थी लहान गट व इयत्ता ५ वी ते ७ वी मोठा गट अशा दोन गटात स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.हा उपक्रम राबविण्यास शाळेचे मुख्याध्यापक श्री.झाल्टे सर,शिक्षकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.त्यांनी आवाहन केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद देत सहभाग नोंदवून आपले कौशल्य दाखविले.या स्पर्धांना सहभागी प्रत्येक विद्यार्थ्याला जयहिंद लोकचळवळीच्या वतीने प्रमाणपत्र देण्यात येणार आहे .तसेच विविध प्रकारातील पहिल्या ५ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात येणार आहे.विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती रुजावी,तसेच महापुरुषांच्या कार्याची ,त्यांच्या त्यागाची माहिती व्हावी यासह उद्याच्या पिढीचा सक्षम नागरिक घडावा यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला असे कुकडे यांनी सांगितले .

# वृंदावन होमिओपॅथिकचा ९९ टक्के निकाल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : वृंदावन होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या बी. एच. एम. एस. अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्ष उन्हाळी सत्र २०२६ परीक्षेचा निकाल ९९ टक्के लागला आहे. या परीक्षेत कु. संस्कृती धुमाळ ७३ टक्के गुण मिळवून प्रथम, कु. आश्लेषा दांगट ७० टक्के गुण मिळवून द्वितीय आणि कु. शर्वरी मुखेकर ६९ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक या विद्यापीठाने घेतलेल्या उन्हाळी सत्रातील अंतिम वर्षाच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत डॉ. आर. एस. गुंजाळ वेलफेअर फाउंडेशन संचलित वृंदावन होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजचा निकाल ९९ टक्के लागला असून महाविद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. कॉलेजमधून परीक्षेला बसलेल्या ९६ विद्यार्थ्यांपैकी ९५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या विद्यार्थ्यांना तत्कालीन प्राचार्य डॉ. अरुण जाधव आणि उपप्राचार्या पूनम ढगे यांच्यासह कॉलेजमधील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. अंतिम परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राधेश्याम गुंजाळ, सचिव तथा मॅनेजिंग डायरेक्टर राहुल गुंजाळ, विश्वस्त उषा गुंजाळ, मुख्य वित्तीय अधिकारी सोनल गुंजाळ आणि प्राचार्या वैशाली काकड यांनी अभिनंदन केले.

# संपादकीय...

## मतदार यादी शुद्धीकरण की मताधिकारावर घाला?

लोकशाहीचा सर्वात महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणजे मतदार. निवडणूक कितीही भव्य असो, प्रचार कितीही आक्रमक असो किंवा राजकीय पक्षांची ताकद कितीही मोठी असो; अंतिम निर्णय मतपेटीतूनच होतो. त्यामुळे मतदार यादी ही केवळ नावांची यादी नसून लोकशाहीच्या अस्तित्वाचा अधिकृत दस्तऐवज आहे. या यादीतील एकही पात्र मतदार चुकीच्या पद्धतीने वगळला गेला, तर त्याचा परिणाम केवळ एका व्यक्तीच्या मतदानावर होत नाही, तर लोकशाहीच्या विश्वासार्हतेवर होतो. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या डखठ अर्थात विशेष सखोल मतदार यादी पुनरावलोकनाच्या प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर 'मतदार यादी शुद्धीकरण की मताधिकारावर घाला?' हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. मतदार यादी अद्ययावत असणे आवश्यक आहे, याबाबत कोणतेही दुमत असू शकत नाही. मृत व्यक्तींची नावे, स्थलांतरित मतदारांची नावे, दुबार नोंदी किंवा चुकीच्या नोंदी दूर करणे ही निवडणूक व्यवस्थेची नियमित आणि आवश्यक प्रक्रिया आहे. बनावट मतदार नोंदींना आळा घालणे आणि प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाची संधी मिळवून देणे ही निवडणूक आयोगाची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र शुद्धीकरणाच्या नावाखाली पात्र नागरिकाचे नावच यादीतून वगळले गेले, तर त्या प्रक्रियेचा उद्देशच संशयाच्या भोवऱ्यात येतो. मतदार यादीतील नाव वगळणे ही साधी प्रशासकीय बाब नाही. मतदानाचा अधिकार हा नागरिकाच्या लोकशाही सहभागाचा मूलभूत मार्ग आहे. एखाद्या नागरिकाला मतदान करता आले नाही, तर तो आपल्या पसंतीचा प्रतिनिधी निवडण्याच्या प्रक्रियेपासून दूर राहतो. म्हणूनच मतदार यादीची पडताळणी करताना 'चूक कोणाची?' या प्रश्नाइतकेच 'नुकसान कोणाचे?' हा प्रश्नही महत्त्वाचा आहे.

एसआरआयच्या प्रक्रियेवरून विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. काही ठिकाणी नागरिकांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्याची अडचण येऊ शकते. ग्रामीण भागातील नागरिक, स्थलांतरित कामगार, गरीब कुटुंबे, वृद्ध नागरिक, भाड्याच्या घरात राहणारे लोक किंवा वारंवार स्थलांतर करणारे नागरिक यांच्यासाठी कागदपत्रांची पूर्तता करणे नेहमीच सोपे नसते. अशा नागरिकांकडे संशयाने पाहण्याऐवजी त्यांना प्रक्रिया समजावून सांगणे आणि आवश्यक मदत उपलब्ध करून देणे अधिक महत्त्वाचे आहे. लोकशाहीमध्ये निवडणूक आयोगावरील विश्वास अत्यंत महत्त्वाचा असतो. आयोगाची प्रक्रिया निष्पक्ष आहे, कोणत्याही राजकीय दबावापासून मुक्त आहे आणि प्रत्येक पात्र मतदाराला समान संधी मिळते, असा विश्वास नागरिकांना वाटला पाहिजे. त्यामुळे मतदार यादीच्या पुनरावलोकनाची प्रत्येक पायरी पारदर्शक असणे गरजेचे आहे. कोणत्या कारणामुळे नाव वगळले गेले, त्यावर हरकत कशी नोंदवायची, अपील कुठे करायचे आणि अंतिम यादीत नाव कसे तपासायचे, याची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत स्पष्टपणे पोहोचली पाहिजे. याठिकाणी आंदोलन करणाऱ्या नागरिकांचे म्हणणेही ऐकून घेण्याची गरज आहे. आंदोलन म्हणजे लोकशाहीविरोधी कृती नव्हे. उलट नागरिकांना एखाद्या प्रक्रियेबद्दल शंका वाटत असेल, तर त्या शंका व्यक्त करण्याचा अधिकार त्यांना आहे. त्याचवेळी आंदोलनातील प्रत्येक आरोप हा अंतिम सत्य मानण्याची गरज नाही. आरोपांची स्वतंत्रपणे पडताळणी झाली पाहिजे. सरकार, निवडणूक आयोग, राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटना या सर्वांनी भावनिक आरोप-प्रत्यारोपांपेक्षा तथ्यांवर चर्चा करणे आवश्यक आहे. मतदार यादीतील शुद्धीकरणाची प्रक्रिया ही निवडणुकीची विश्वासार्हता वाढविण्यासाठी असते. त्यामुळे या प्रक्रियेमध्ये नागरिकांना त्रास होईल, भीती निर्माण होईल किंवा पात्र मतदार मतदानापासून वंचित राहतील, अशी परिस्थिती निर्माण होता कामा नये. उलट प्रक्रिया जितकी कठोर असेल तितकी नागरिकाभिमुखही असली पाहिजे. कागदपत्रे नसलेल्या किंवा कागदपत्रांबाबत अडचण असलेल्या नागरिकांना योग्य मार्गदर्शन मिळाले पाहिजे.

## अकोले-भंडारदरा सायकल रॅलीतून वन्यजीव संवर्धनाचा जागर



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - वन्यजीव सप्ताहानिमित्त मॉर्निंग वॉक ग्रुप अकोले, अगस्ती सायकल क्लब अकोले आणि कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अकोले-भंडारदरा (पांजरे बेट) सायकल रॅली उत्साहात पार पडली. या रॅलीत ४५ सायकलपटूंनी सहभाग घेत ५५ किलोमीटरचे अंतर पूर्ण केले. महिलांचाही उत्स्फूर्त सहभाग होता.

वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने वन्यजीव, जैवविविधता आणि निसर्ग संवर्धनाचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. वन्यजीवांचे संरक्षण ही केवळ वन विभागाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने त्यात योगदान देणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमास नाशिक वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक तथा खत्रड कृष्णा भवर, सहाय्यक वनसंरक्षक अनिल पवार, वनपरिक्षेत्र अधिकारी रुपेश गावित, प्रतिभा सोनवणे, डॉ. विष्णू बुळे आदी उपस्थित होते.

कृष्णा भवर यांनी कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यातील जैवविविधता, वन्यप्राणी, पक्षी व वनस्पतींच्या अधिवासाचे महत्त्व स्पष्ट केले. पर्यटकांनी निसर्गाचा आनंद घेताना वन्यजीवांच्या अधिवासाला बाधा पोहोचणार नाही, याची काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. अनिल पवार यांनी जंगलात कचरा न टाकणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि वन्यजीवांना त्रास न देणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सांगितले.

माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या स्वराज सहाणे याने भाषणातून, ही पृथ्वी जशी आज आहे, तशीच आमच्या तरुणपणातही आम्हाला हवी आहे, अशी भावना व्यक्त करत भावी पिढ्यांसाठी निसर्ग संवर्धनाची गरज अधोरेखित केली.

रॅलीत डॉक्टर, प्राध्यापक, शिक्षक, व्यावसायिक, नोकरदार, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिलांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रुपेश गावित यांनी केले. सूत्रसंचालन भाऊसाहेब कासार यांनी, तर आभार डॉ. निलेश सहाणे यांनी मानले. रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्या वन विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. सहभागी सायकलपटूंना कृष्णा भवर यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

## डॉ. गुंजाळ फाउंडेशनमध्ये शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - चंदनापुरी घाटातील वृंदावन होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या हॉस्पिटलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या होमिओपॅथिक शिबिराला रुग्णांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. २८४ रुग्णांनी शिबिरात सहभागी होऊन मोफत होमिओपॅथिक तपासणी आणि औषधोपचाराचा लाभ घेतला.

महात्मा गांधी जयंती निमित्त डॉ. आर. एस. गुंजाळ वेलफेअर फाउंडेशन संचलित वृंदावन होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलच्या वतीने मोफत होमिओपॅथिक तपासणी व औषधोपचार शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष डॉ. राधेश्याम गुंजाळ यांच्या हस्ते झाले. यावेळी कॉलेजच्या उपप्राचार्या डॉ. पूनम ढगे, वृंदावन हॉस्पिटलचे सीनियर मेडिकल ऑफिसर डॉ. सुनील मदने, डॉ. सूरज ढगे उपस्थित होते. १९८३ सालापासून सुरू करण्यात आलेला हा आरोग्यसेवेचा यज्ञ ४४ व्या वर्षीही नियमितपणे सुरू आहे. यांनी केली. शिबिराच्या प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन करण्यात आले. या शिबिरात संगमनेर तालुक्यासह विदर्भ मराठवाडा आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील रुग्णांनी सहभागी होत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शिबिरात सहभागी रुग्णांची तपासणी प्रख्यात कॅन्सर तज्ञ डॉ. राधेश्याम गुंजाळ यांच्यासह इतर तज्ज्ञ डॉक्टरांनी तपासणी करून मलेरिया टायफॉईड, डेंग्यू, चिकनगुनिया या आजारांबरोबरच जुनाट आणि दुर्धर आजारांचे निदान करून औषधोपचार केले. या शिबिराचा २८४ रुग्णांनी लाभ घेतला.


CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
Shaikh Farid Shaikh Mohammed
NEW NAME AS
Farid Mahammad Shaikh
Add:- Mogalpura Pune Road Sangamner 422605 Dist - Ahilyanagar


## भीमाशंकर-शिवनेरी प्रवासातून एम.बी.ए व एम.सी.ए विद्यार्थ्यांना अनुभवांची शिदोरी




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर-शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.बी.ए इन्स्टिट्यूट, संगमनेर तर्फे एम.बी.ए व एम.सी.ए विद्यार्थ्यांसाठी शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी भीमाशंकर व शिवनेरी किल्ला येथे ट्रेकिंग व आउटबाउंड ॲक्टिव्हिटीचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वर्गाबाहेरील अनुभवात्मक शिक्षणाची संधी मिळाली. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संघभावना, वेळेचे नियोजन, शिस्त, समन्वय, निर्णयक्षमता व समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्यावर भर देण्यात आला.

उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी भीमाशंकर परिसरातील निसर्गसौंदर्याचा अनुभव घेतला तसेच शिवनेरी किल्ल्याच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाची माहिती जाणून घेतली. साहसी उपक्रमासोबतच विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याशी संबंधित ऐतिहासिक स्थळाची प्रत्यक्ष अनुभूती मिळाल्याने त्यांच्या ज्ञानात व अनुभवात भर पडली.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी संस्थेच्या वतीने आवश्यक सूचना देण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांनी शिस्त, सुरक्षितता आणि संस्थेच्या नियमांचे पालन करत उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या उपक्रमाचे नियोजन व आयोजन प्रा. संतोष खामकर व प्रा. महेश पावडे यांनी केले. उपक्रमासाठी विभागप्रमुख डॉ. किरण गोंटे व संचालक डॉ. नितीन झावरे यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. अंदुरे व प्रा. काकड यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष सहकार्य केले.


NKG Engineers & Govt Contractor
हेड ऑफिस. शिवाजीनगर, संगमनेर येथे
आवश्यकता आहे
रिसेप्शनिस्ट / ऑफिस को-ऑर्डिनेटर पाहिजे
आवश्यक पात्रता :
पगार : पात्रतेनुसार ठरविण्यात येईल.
संपर्क : 9822684402



CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
Naseem Rafique Khan
NEW NAME AS
Nasim Rafique khan
Add:-Alka nagar Juna Jorve Road, Sangamner 421605 Dist- Ahilyanagar



पाहिजेत
सेल्समन - ४ जागा
अकाऊंटंट - १ जागा
मॅनेजर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य )
आकर्षक पगार दिले जाईल
मैड सराफ ॲण्ड सन्स
नेहरूचौक, संगमनेर
9850530266


## मराठी अभिजात भाषा दिनानिमित्त राज्यस्तरीय काव्यस्पर्धा



युवावार्ता (प्रतिनिधी)

मराठी अभिजात भाषा दिनानिमित्त साहित्य कला मंच, संगमनेर यांच्या वतीने ३ ऑक्टोबर रोजी राज्यस्तरीय काव्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विविध जिल्ह्यांतून सहभागी झालेल्या कवींच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे ही स्पर्धा साहित्यिक वातावरणात उत्साहात पार पडली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्रा. चंद्रकांत देशमुख होते. सुप्रसिद्ध कवी रज्जाकभाई शेख आणि प्रसिद्ध कवयित्री सुनिता वाळूंज यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. आनंदा साळवे व एन. डी. कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात विविध विषयांवरील दर्जेदार कवितांनी रसिक श्रोत्यांची मने जिंकली. स्पर्धेत पुणे येथील युवाकवी अंकीत आव्हाड यांनी प्रथम क्रमांक, शेवगाव येथील शरद चाबुकस्वार यांनी द्वितीय क्रमांक, तर संगमनेर येथील निवृत्ती महाराज कानवडे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. स्वाती शेटे व गौतम वाघमारे (संगमनेर) हे उत्तेजनार्थ क्रमांकाचे मानकरी ठरले. यावेळी साहित्य कला मंचचे संस्थापक अध्यक्ष संजय नवले, अध्यक्षा सुनिता घुले, उपाध्यक्ष नितीन वाकचौरे, सचिव अनिल चांडक, खजिनदार अकबरभाई शेख, मार्गदर्शक देव्हारे सर, जयराम घुले सर, रमेश शिंदे, विवेक वाकचौरे, चैत्राली घुले यांच्यासह साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक शेटे व प्रतिमा काळे यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी मराठी भाषेचा समृद्ध साहित्यिक वारसा जपत तिच्या संवर्धनासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. यावेळी उपस्थितांना मराठी अभिजात भाषा दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.


पाहिजेत
ड्रायव्हर कम हेल्पर पाहिजे
आत्मशांती टी सेंटर
( सपट चहा)
नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090



CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
Shaikh MahamadRafik Mahmudmiya
NEW NAME AS
Rafik Mahamad Shaikh
Address:-
Mu Po Sangamner Khurd Sangamner 422605 Dist Ahilyanagar



पाहिजेत
डिप्लोमा सिव्हिल इंजिनिअर - 2 जागा
स्वतःची टू व्हीलर लायसन्स आवश्यक
B & K Construction
7758009532
7028456005



20 गुंठे जागा भाडे तत्त्वावर देणे आहे
नूतन माध्यमिक विद्यालया पुढे, राजापूर, तालुका- संगमनेर. जिल्हा अहिल्यानगर.
7798616908











पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)



जागा भरणे आहे
ऑफिस बॉय
ऑफिस क्लार्क
महिला किंवा पुरूष
इलेक्ट्रॉनिक मशिनरी चालविणेचा अनुभव असलेला कारागीर
वॉचमेन
अनुभवास प्राधान्य
- संपर्क -
9822334431



पाहिजेत
नॅशनल मेडीकल हॉस्पिटल ऑफ आयुर्वेदिक सायन्स
वेल्हाळे, ता. संगमनेर
पंचकर्म थेरापिस्ट
पुरूष-१/ स्त्री -१
आकर्षक पगार
9370071777
8806292948



पाहिजेत
दुकान कामासाठी होतकरू मुलगा पाहिजे - २ जागा
आकर्षक पगार
राजा ड्रेसेस
बाजारपेठ, ता. संगमनेर, जि. अ.नगर
8275191096

# अविस्मरणीय हेरिटेज वॉक - राजा हरिश्चंद्रगड



रविवार, दिनांक ४ ऑक्टोबर २०२६ हा माझ्या आयुष्यातील एक अविस्मरणीय आणि सुवर्णाक्षरांनी नोंदवावा असा दिवस ठरला.आपल्या अकोले तालुक्याच्या वैभवशाली इतिहासाची, समृद्ध सांस्कृतिक परंपरेची आणि अद्भुत निसर्गसौंदर्याची साक्ष देणाऱ्या राजा हरिश्चंद्रगडावर *Heritage Walk - Legacy of Our Ancestors* या उपक्रमात सहभागी होण्याचे भाग्य लाभले. इतिहास व भूगोलाचे गाढे अभ्यासक प्रा. विठ्ठलराव शेवाळे सर, प्रोजेक्ट हेड प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ सर, रमेश थोरात साहेब, त्यांचे सहकारी प्राध्यापक व विद्यार्थी, तसेच माझे मित्र माजी वायुसैनिक, निवृत्त पोलीस निरीक्षक व अकोले तालुका माजी सैनिक संघाचे प्रवक्ते श्री. नारायण उगले आणि अकोल्यातील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. उमा कुलकर्णी मॅडम, अशा सुमारे ३० जणांच्या अभ्यासू आणि उत्साही टीमसोबत हा हेरिटेज वॉक करण्याचा अनुभव खरोखरच संस्मरणीय ठरला. या संपूर्ण भटकंतीदरम्यान प्रा. विठ्ठलराव शेवाळे सरांनी हरिश्चंद्रगडावरील प्रत्येक ऐतिहासिक स्थळ, शिलालेख, मूर्ती, वास्तू आणि त्यामागील इतिहास व संशोधन अत्यंत अभ्यासपूर्ण आणि रंजक पद्धतीने समजावून सांगितला. त्यामुळे आपण ज्या भूमीत राहतो, त्या भूमीच्या इतिहासाची आणि वारशाची नव्याने ओळख झाली.विशेष म्हणजे, १९७६-७७ मध्ये महाशिवरात्रीच्या निमित्ताने आणि १९८० मध्ये NCC मध्ये असताना मी हरिश्चंद्रगडाला भेट दिली होती. जवळपास चार-पाच दशकांचा प्रदीर्घ कालावधी उलटल्यानंतर पुन्हा एकदा याच पवित्र, ऐतिहासिक आणि निसर्गरम्य भूमीवर येण्याचा योग आला आणि जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. मात्र यावेळची भेट केवळ पर्यटनाची नव्हती; ती होती आपल्या पूर्वजांच्या वारशाला जाणून घेण्याची, इतिहास समजून घेण्याची आणि आपल्या अकोले तालुक्याच्या समृद्ध वैभवाचा अभिमान नव्याने अनुभवण्याची! हरिश्चंद्रगडाच्या कडेकपारी, प्राचीन वास्तू, शिलालेख, लेणी, मंदिरपरंपरा आणि सह्याद्रीचे अद्भुत निसर्गसौंदर्य पाहताना मन अक्षरशः भारावून गेले. आपल्या तालुक्यात एवढा समृद्ध आणि अनमोल ऐतिहासिक व नैसर्गिक ठेवा आहे याची अधिक सखोल जाणीव या हेरिटेज वॉकमुळे झाली.

या अविस्मरणीय अनुभवासाठी S.B.V.P. समाजाचे सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स व जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल, संगमनेर, तसेच या उपक्रमाशी संबंधित सर्व आयोजक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि सहभागी मित्रांचे मनःपूर्वक आभार!

वारसा केवळ पाहायचा नसतो, तो जाणून घ्यायचा, जपायचा आणि पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवायचा असतो.

राजा हरिश्चंद्रगड - इतिहासाचा अभिमान, निसर्गाचे वैभव आणि आपल्या अकोले तालुक्याची अमूल्य ओळख!

या अविस्मरणीय हेरिटेज वॉकच्या आठवणी कायम मनात राहतील.

**सुभेदार भास्कर तळेकर**
**अध्यक्ष, अकोले तालुका माजी सैनिक संघ, अकोले**

पान १ वरून

## सायखिंडी...

जप्त करण्यात आलेल्या पदार्थाचे नेमके वजन, बाजारातील किंमत तसेच तो गांजाच आहे किंवा अन्य कोणता पदार्थ आहे, याबाबत अधिकृत तपासणी व पंचनामा प्रक्रिया सुरू होती. त्यामुळे सोमवारी दुपारपर्यंत पोलिसांकडून यासंदर्भात अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नव्हती. प्राथमिक माहितीनुसार जप्त मुद्देमालाची किंमत काही लाख रुपये असल्याची चर्चा आहे. या कारवाईमुळे संगमनेर शहर व परिसरात अवैध अमली पदार्थांची वाहतूक करणाऱ्या साखळीवर पुन्हा एकदा पोलिसांचे लक्ष केंद्रित झाले आहे. महामार्गावरून होणाऱ्या अशा संशयास्पद वाहतुकीवर पोलिसांकडून पाळत ठेवली जात असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. दरम्यान, जप्त केलेला पदार्थ नेमका किती प्रमाणात आहे, त्याचा स्रोत कोणता, तो कुठे नेण्यात येत होता आणि या प्रकरणामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# अहिंसेच्या शक्तीने इतिहास घडविणारे महात्मा गांधी



महात्मा गांधी यांचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे होते. त्यांचा जन्म २ आक्टोबर १८६९ रोजी पोरबंदर, गुजरात येथे साला. त्यांचे वडील करमचंद गांधी व आई पुतलीबाई गांधी. त्यांचे वडील पोरबंदर संस्थानमध्ये दिवाण होते. आई पुतळीबाई अत्यंत धार्मिक आणि शिस्तप्रिय होत्या. आईच्या व्यक्तिमत्त्वाचा गांधीजीच्या विचारावर मोठा प्रभाव पडला. २ आक्टोबर हा भारतात गांधी जयंती म्हणून साजरा केला जातो. हा दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणूनही पाळला जातो.

गांधीजी लहानपणी अत्यंत शांत आणि संकोचीत स्वभावाचे होते. त्यांना लरानपणापासूनच सत्यू, धार्मिकता आणि नैतिकतेचे संस्कार मिळाले. आईच्या धार्मिक वातावरणामुळे त्यांच्यावर हिंदूधर्माचा प्रभाव होता. पण पुढे त्यांनी जैन, बौद्ध, ख्रिश्चन आणि रतर धार्मिक विचारांचाटरी अभ्यास केला. वयाच्या १३ व्या वर्षी त्यांचे लग्न कस्तुरबा गांधी यांच्याशी १८८३ मध्ये झाले. गांधीजी नंतर बालविवाहाच्या प्रथेवर टीका करु लागले. कस्तुरबा यांनी स्वातंत्र्य लढ्यात अनेकदा तुरुंगवास भोगला आणि गांधीजीच्या सार्वजनिक जीवनात सक्रिय साथ दिली. १८८८ मध्ये गांधीजी लंडनला कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी गेले. ल्यानी येथे कायद्याचा अभ्यास केला आणि १८९१ मध्ये बॅरिस्टर झाले. १८९३ मध्ये गांधीजी वकिलीच्या कामासाठी दक्षिण आफ्रिकेत गेले. त्यांना त्याठिकाणी वर्णभेदाचा प्रत्यक्ष अनुभव आला. रेल्वे प्रवासात गांधीजीकडे प्रथम श्रेणीचे तिकीट होते. तरीही वर्णभेदामुळे एका गोऱ्या प्रवाशाच्या तक्रारीवरून त्यांना ट्रेन मधून बाहेर फेकण्यात आले. हा प्रसंग त्यांच्या आयुष्यातील निर्णायक क्षण ठरला. त्यांनी विचार केला

मी अन्याय सहन करून परत भारतात जावे की या अन्यायाविरुध्द लढावे ? दक्षिण आफ्रिकेत भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाविरुध्द त्यांनी आंदोलन सुरु केले, पण त्यांची पद्धत वेगळी होती. ते म्हणत अन्यायाविरुध्द लढा पण द्वेषाने नाही, यातून पुढे सत्याग्रह ही संकल्पना विकसित झाली. सत्याग्रह म्हणजे सोप्या भाषेत सत्याचा आग्रह धरून अन्यायाचा अहिंसक मार्गाने विरोध करणे, यामध्ये हिंसा नाही, सूड नाही, द्वेष नाही, अन्यायाला शरण जाणेही नाही.

१९१५ मध्ये गांधीजी भारतात परतले. त्यांनी लगेच मोठे आंदोलन सुरु केले. त्यांचे राजकीय मार्गदर्शक गोपाळ कृष्ण गोखले होते, गोखले यांनी गांधीजींना भारत समजून घेण्यासाठी देशभर प्रवास करण्याचा सल्ला दिला. गांधीजींनी भारतातील शेतकरी, कामगार, गरीब आणि सामान्य लोकांचे जीवन जवळून पाहिले. १९१७ मध्ये चंपारण सत्याग्रह केला. बिहार-मधील शेतकऱ्यांना निळीची शेती करण्यासाठी ब्रिटीश जमीनदाराकडून दबाव आणला जात होता. गांधीजीनी शेतकऱ्यांच्या बाजूने आंदोलन केले. हे आंदोलन यशस्वी ठरले आणि गांधीजीचे राष्ट्रीय नेतृत्व अधिक मजबूत झाले. १९१८ मध्ये गुजरातमधील खेडा जिल्ह्यात शेतकऱ्यावर कराचा प्रश्न निर्माण झाला, पीक खराब झाले असूनही कर वसूल केला जात असल्याचा शेतकऱ्याचा आक्षेप होता. गांधीजीनी कर न भरण्याच्या अहिंसक आंदोलनाचा पाठींबा दिला. १९१८ मध्ये अहमदाबाद मधील कापड गिरणी कामगारांच्या वेतनाच्या प्रश्नावरही गांधीजीनी हस्तक्षेप केला. कामगारांच्या मागण्यासाठी त्यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला. गांधीजीच्या आंदोलनाच्या पध्दतीमध्ये उपोषणाला महत्वाचे स्थान मिळाले. गांधीजीच्या हातातील चरखा हे स्वातंत्र्य लढ्याचे एक प्रसिध्द प्रतीक बनले. लोकांनी परदेशी कापड जाळावे आणि भारतीय कापड वापरावे असा संदेश त्यांनी दिला. १९३० मध्ये गांधीजींनी ब्रिटीशांच्या मिठाच्या कायद्या विरुध्द आंदोलन केले.

गांधीजीच्या विचारांचा आधार तीन शब्दान सांगता येतो.

सत्य - गांधींसाठी सत्य अत्यंत महत्वाचे होते. त्यांचे प्रसिद्ध विधान होते,

सत्य हाच देव आहे

अहिंसा - अहिंसा म्हणजे फक्त कोणाला मारु नये एवढेच नव्हे त्यांच्या मते मन, शब्द आणि कृतीतून द्वेष कमी करणे हा अहिंसेचा व्यापक अर्थ होता.

सत्याग्रह - सत्यासाठी ठाम राहुन अन्यायाचा अहिंसक विरोध करणे.

करेंगे या मरेंगे हा त्यांनी दिलेला भारतीयांना प्रसिध्द संदेश होय. गांधीजींनी अस्पृश्यतेच्या प्रथेला विरोध केला. ते दलितांना समाजात समान स्थान मिळावे यासाठी काम करत होते, दलितासाठी ल्योनी हरिजन हा शब्द वापरला-

**संकलन**
**सुभाष बाबुराव थिटे**
**संगमनेर, मो. ९२७०३८०८२५**

पान १ वरून

## अॅड. थोरातांची ...

स्पर्धांमध्ये सहभागी होत अनेक पारितोषिके मिळवली आहेत. विशेष म्हणजे नदीपात्रात बुडणाऱ्या अनेक व्यक्तींचे प्राण वाचविण्यातही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यामुळे त्यांच्या जलतरण कौशल्याला स्पर्धात्मक यशासोबतच सामाजिक कार्याचीही जोड लाभली आहे.

या स्पर्धेत श्रीरामपूर येथील डॉ. सोमानी, राजकुमार यादव आणि मोरे यांनीही उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्ण व रौप्य पदके मिळवली.

अॅड. सदाशिवराव थोरात यांच्या या यशाबद्दल संगमनेरसह अहिल्यानगर जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन होत असून, आगामी राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांचे अभिनंदन व शुभेच्छा.

## भारताचा विजयाचा डंका

# २१ सुवर्णपदकांसह मिळवली एकूण ८५ पदके

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ आज समाप्त झाली असून भारताने यावर्षी विजयाचा डंका वाजवलाय. एकूण ८५ पदकं भारतीय खेळाडूंनी आपल्या कौशल्याने आणि ताकदीने जिंकली. आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अंतिम पदकतालिकेत भारत चौथ्या क्रमांकावर आहे. चीन आणि जपान अनुक्रमे पहिल्या आणि दुसऱ्या स्थानावर असून दक्षिण कोरिया या तालिकेत तिसऱ्या क्रमांकावर आहे. पुरुषांच्या हॉकीच्या खेळाने या स्पर्धेचा शेवट झाला, ज्यात भारताला सुवर्णपदक मिळाले. यावर्षीच्या स्पर्धेतील भारताचे हे २१ वे सुवर्णपदक होते. ही देशासाठी अभिमानास्पद बाब आहे. भारताने कोणत्या स्पर्धांमध्ये कोणते पदक मिळवले जाणून घेऊ. भारताने २१ सुवर्ण, २७ रौप्य आणि ३७ कांस्य अशी एकूण ८५ पदके मिळवली. भारताची आशियाई स्पर्धेतील दुसरी सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे. पहिली कामगिरी ही २०२३ चीन येथील हांगझोऊ येथे एकूण १०७ पदके मिळवत केली होती. त्यावेळी देखील भारत चौथ्या क्रमांकावर होता. भारताला सर्वाधिक पदके ही थलेटिक्स स्पर्धेत मिळाली. १ सुवर्ण, ९ रौप्य, १४ कांस्य अशी एकूण २४ पदके थलेटिक्समध्ये मिळाली. तर सर्वाधिक सुवर्ण पदके तिरंदाजीमध्ये (५) मिळाली.

## दिनविशेष

२०१०: इंस्टाग्राम — सुरवात.
२००७: जेसन लुइस — वल्ह्याच्या होडीतुन पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण करणारे पहिले व्यक्ती बनले.
१९९५: ५१ पेगासी बी — दुसऱ्या सूर्याभोवती फिरणारा हा पहिला ग्रह शोधला गेला.
१९८९: फातिमा बिबी — या सर्वोच्च न्यायालयातील पहिल्या महिला न्यायाधीश बनल्या.
१९८७: फिजी — देश प्रजासत्ताक बनला.
१९८१: अन्वर सादात — इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष यांची इस्लामिक अतिरेक्यांनी हत्या केली.
१९७३: योम किप्पूर युद्ध — इजिप्त व सीरीयाने मिळुन इस्त्राएलवर हल्ला केला.
१९४९: राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA) — पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते खडकवासला येथे इमारतीची कोनशिला बसवण्यात आली.
१९४४: दुसरे महायुद्ध — डुक्ला पासची लढाई: चेकोस्लोव्हाक आर्मी कॉर्प्सच्या तुकड्या चेकोस्लोव्हाकियामध्ये दाखल झाल्या.

### जन्म

१९७८: लिऊ यांग — अंतराळात जाणाऱ्या पहिल्या चिनी महिला
१९७२: सलील कुलकर्णी — भारतीय संगीतकार
१९४६: टोनी ग्रेग — इंग्लिश क्रिकेटपटू व समालोचक (निधन: २९ डिसेंबर २०१२ )
१९४६: विनोद खन्ना — भारतीय अभिनेते, चित्रपट निर्माते व खासदार — दादासाहेब फाळके पुरस्कार (निधन: २७ एप्रिल २०१७ )
१९४३: डॉ. रत्नाकर मंचरकर — भारतीय संत साहित्याचे गाढे अभ्यासक (निधन: २० फेब्रुवारी २०१२ )
१९४१: पॉल पोफम — अमेरिकन सैनिक आणि कार्यकर्ता, गे मेन्स हेल्थ क्रायसिसचे सहसंस्थापक (निधन: ७ मे १९८७ )
१९३३: राजकुमार मुकर्रम जाह — हैदराबादचे ८वे निजाम (निधन: १५ जानेवारी २०२३ )
१९३१: रिकार्डो जियाकोनी — इटालियनअमेरिकन खगोलभौतिकशास्त्रज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ — नोबेल पुरस्कार (निधन: ९ डिसेंबर २०१८ )

### मृत्यू

८७७: चार्ल्स द बाल्ड — पवित्र रोमन सम्राट (जन्म: १३ जून ०८२३ )
२०१७: डेव्हिड मार्क्स — ब्रिटिश आर्किटेक्ट, लंडन आयचे रचनाकार (जन्म: १५ डिसेंबर १९५२ )
२०१५: अरपॅड गॉन्कझ — हंगेरी देशाचे पहिले अध्यक्ष (जन्म: १० फेब्रुवारी १९२२ )
२०१२: बी. सत्य नारायण रेड्डी — भारतीय वकील आणि राजकारणी, पश्चिम बंगालचे १९वे राज्यपाल (जन्म: २१ ऑगस्ट १९२७ )
२०१२: चाडली बेंडजेडीड — अल्जेरिया देशाचे ३रे अध्यक्ष (जन्म: १४ एप्रिल १९२९ )
२००७: लक्ष्मी मल सिंघवी — भारतीय विधिज्ञ, मुत्सद्दी, विद्वान आणि मानवाधिकार विचारवंत, ब्रिटनमधील भारताचे उच्चायुक्त म्हणूनही कार्य ओळख — पद्मभूषण (जन्म: ९ नोव्हेंबर १९३१ )
२००७: बाबासाहेब भोसले — महाराष्ट्राचे ९वे मुख्यमंत्री, वकील आणि राजकारणी (जन्म: १५ जानेवारी १९२१ )
१९८१: अन्वर सादात — इजिप्तचे ३रे राष्ट्राध्यक्ष — नोबेल पुरस्कार (जन्म: २५ डिसेंबर १९१८ )
१९७९: दत्तो वामन पोतदार — भारतीय इतिहासकार, लेखक आणि शिक्षणतज्ज्ञ, मराठी इतिहास संशोधनातील महत्त्वाचे विद्वान — पद्मभूषण, विविध शैक्षणिक व ऐतिहासिक सन्मान (जन्म: ५ ऑगस्ट १८९० )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**०६ ऑक्टोबर**

# इंस्टाग्रामची सुरुवात; एका छोट्या कल्पनेचा जागतिक प्रवास

२०१० हे वर्ष सोशल मीडियाच्या इतिहासात महत्त्वाचे ठरले. याच वर्षी इंस्टाग्राम (Instagram) या फोटो आणि व्हिडिओ शेअरिंग प्लॅटफॉर्मची सुरुवात झाली. केविन सिस्ट्रॉम आणि माईक क्रिगर या दोघांनी मिळून इंस्टाग्रामची निर्मिती केली. सुरुवातीला मोबाईलवरून सुंदर आणि आकर्षक छायाचित्रे काढणे, त्यावर फिल्टर लावणे आणि ती मित्रांसोबत शेअर करणे, एवढेच त्याचे मुख्य उद्दिष्ट होते. मात्र पुढील काही वर्षांत या साध्या कल्पनेने संपूर्ण डिजिटल जगाचे स्वरूप बदलून टाकले.इंस्टाग्रामचा प्रवास Burbn या प्रकल्पापासून सुरू झाला. केविन सिस्ट्रॉम यांनी तयार केलेल्या या ॲपमध्ये अनेक सुविधा होत्या; मात्र वापरकर्त्यांना छायाचित्रे शेअर करण्याची सुविधा सर्वाधिक आवडत असल्याचे लक्षात आले. त्यानंतर सिस्ट्रॉम आणि क्रिगर यांनी ॲपची संकल्पना अधिक सोपी करून केवळ फोटो शेअरिंगवर लक्ष केंद्रित केले. अखेर ६ ऑक्टोबर २०१० रोजी इंस्टाग्राम अधिकृतपणे सुरू झाले.सुरुवातीला इंस्टाग्राम केवळ Apple च्या iPhone साठी उपलब्ध होते. त्याच्या साध्या इंटरफेसमुळे आणि फोटोवर विविध प्रकारचे फिल्टर वापरण्याच्या सुविधेमुळे ते अल्पावधीत लोकप्रिय झाले. जुन्या किंवा सामान्य छायाचित्रांनाही आकर्षक रूप देऊन ती त्वरित मित्रांसोबत शेअर करता येत असल्याने तरुणांमध्ये इंस्टाग्रामची विशेष क्रेझ निर्माण झाली.इंस्टाग्रामची वाढ अतिशय वेगाने झाली. सुरुवातीच्या काळातच लाखो वापरकर्ते या प्लॅटफॉर्मशी जोडले गेले. २०१२ मध्ये इंस्टाग्राम Android वापरकर्त्यांसाठीही उपलब्ध झाले. त्याच वर्षी फेसबुकने इंस्टाग्रामला सुमारे १ अब्ज डॉलरमध्ये विकत घेतले. हा सोशल मीडिया उद्योगातील त्या काळातील अत्यंत चर्चेचा व्यवहार ठरला.पुढील काळात इंस्टाग्राम केवळ फोटो शेअरिंग ॲप राहिले नाही. व्हिडिओ, स्टोरीज, लाइव्ह व्हिडिओ, रील्स, मेसेजिंग, जाहिराती आणि व्यावसायिक खात्यांसारख्या सुविधा त्यात जोडल्या गेल्या. विशेषतः Instagram Stories आणि नंतर Reels यामुळे प्लॅटफॉर्मची लोकप्रियता आणखी वाढली. आज कलाकार, खेळाडू, पत्रकार, राजकीय नेते, व्यावसायिक, छोटे उद्योजक आणि सामान्य नागरिकदेखील इंस्टाग्रामचा वापर मोठ्या प्रमाणावर करतात.व्यवसायाच्या दृष्टीनेही इंस्टाग्रामने मोठी क्रांती घडवली. पूर्वी जाहिरातींसाठी वर्तमानपत्रे, दूरदर्शन किंवा होर्डिंगवर अवलंबून राहावे लागत असे. मात्र इंस्टाग्राममुळे छोट्या व्यवसायांनाही थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली. उत्पादनांचे फोटो, व्हिडिओ, रील्स आणि ग्राहकांच्या प्रतिक्रिया यांचा वापर करून ब्रँडची ओळख निर्माण करणे शक्य झाले.

# डॉ. रत्नाकर मंचरकर — संत साहित्याचे गाढे अभ्यासक

**जन्मदिन विशेष**

मराठी साहित्यविश्वात संत साहित्याचा अभ्यास, संशोधन आणि चिकित्सक समीक्षा यांना समृद्ध करणारे महत्त्वाचे नाव म्हणजे डॉ. रत्नाकर मंचरकर. त्यांचा जन्म ६ ऑक्टोबर १९४३ रोजी झाला. संत साहित्याचे गाढे अभ्यासक, साक्षेपी समीक्षक आणि संशोधक म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली.डॉ. मंचरकर यांची साहित्यिक कारकीर्द अध्यापनाशी जोडलेली होती. जून १९६६ पासून त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयांत मराठीचे अध्यापन केले. पुढे श्रीरामपूर येथील रा. ब. ना. बो. महाविद्यालयातील पदव्युत्तर अध्ययन व संशोधन केंद्राच्या मराठी विभागाशी ते जोडले गेले. अध्यापनाबरोबरच संशोधन आणि साहित्यलेखनामध्ये त्यांनी सातत्याने योगदान दिले.जुनी-नवी साहित्यमीमांसा, नवे वाङ्मयप्रवाह, तौलनिक साहित्याभ्यास आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय ही त्यांच्या



अभ्यासाची प्रमुख क्षेत्रे होती. विशेषतः संत साहित्याचा त्यांनी अत्यंत सखोल आणि चिकित्सक पद्धतीने अभ्यास केला. संत साहित्याकडे केवळ भक्तिपर साहित्य म्हणून न पाहता त्यामागील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि वैचारिक प्रवाह समजून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला.मध्ययुगीन मराठी साहित्याच्या अभ्यासात त्यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि अन्य संतपरंपरेतील साहित्याचा अभ्यास करताना त्यांनी भाषिक वैशिष्ट्ये, साहित्यिक मूल्ये आणि तत्कालीन समाजजीवन यांचा परस्परसंबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे संत साहित्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना त्यांच्या लेखनाचा मोठा उपयोग झाला.प्राचीन मराठी साहित्याच्या ग्रंथसंपादनाचे कामही त्यांनी केले. ज्ञानेश्वरीच्या विविध अध्यायांचे तसेच 'सामराजकृत रुक्मिणीहरण' यांसारख्या ग्रंथांचे संहितासंपादन त्यांनी केले. जुन्या हस्तलिखित आणि साहित्यिक परंपरेचा चिकित्सक अभ्यास करून मूळ साहित्य अधिक व्यवस्थितपणे अभ्यासकांसमोर आणणे हे त्यांच्या कार्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते.'तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय' हा त्यांच्या महत्त्वाच्या ग्रंथांपैकी एक मानला जातो. या माध्यमातून त्यांनी मराठीच्या मध्ययुगीन साहित्याचा व्यापक आणि तुलनात्मक दृष्टिकोनातून विचार केला. त्यांच्या लेखनात साहित्याचा इतिहास, संत साहित्य, धर्मसंप्रदाय, मध्ययुगीन वाङ्मय आणि साहित्यसमीक्षा यांसारख्या विविध विषयांचा अभ्यासपूर्ण वेध आढळतो.डॉ. मंचरकर यांचे लेखन केवळ माहिती देणारे नव्हते, तर वाचकाला आणि अभ्यासकाला विचार करण्यास प्रवृत्त करणारे होते. संत साहित्याच्या अभ्यासात चिकित्सक दृष्टी, संदर्भांचा बारकाईने विचार आणि साहित्याच्या सामाजिक भूमिकेचे भान या बाबींना त्यांनी विशेष महत्त्व दिले.२० फेब्रुवारी २०१२ रोजी त्यांचे निधन झाले. मात्र अध्यापन, संशोधन, ग्रंथसंपादन आणि साहित्यसमीक्षा या क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य आजही महत्त्वाचे आहे.

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# टंचाईच्या काळात अधिकारी गावागावात पोहचले पाहिजेत- ना. विखे

## पशुसंवर्धन विभागाच्या कारभारावर नाराजी, हलगर्जीपणा करणाऱ्यांना कारवाईचा इशारा




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - टंचाईच्या परिस्थितीत प्रशासनाने केवळ कार्यालयात बसून कारभार न करता अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गावागावात जाऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात. कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची वेळ प्रशासनाने आणू नये अशा शब्दांत जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रशासकीय यंत्रणेला सुनावले.

संगमनेर तालुक्यातील टंचाईच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांची आढावा बैठक झाली. या बैठकीत पाणी, चारा, वीजपुरवठा, पीक नुकसान, जलजीवन मिशन तसेच टँकरद्वारे पाणीपुरवठ्याच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी आमदार अमोल खताळ, अतिरिक्त जिल्हाधिकारी शैलेंद्र हिंगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, प्रांताधिकारी अरुण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत पशुसंवर्धन विभागाच्या कामकाजावर पालकमंत्री विखे पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. उपस्थित शेतकऱ्यांनी तालुक्यात 'झिरो पशुवैद्यकीय अधिकारी' नेमून कारभार सुरू असल्याच्या तक्रारी केल्या. पशुधनाला लसीकरण करण्यासाठी अतिरिक्त पैसे घेतले जात असल्याच्या तक्रारीही करण्यात आल्या.

चारा उत्पादनासाठी कोणत्या शेतकऱ्यांना बियाणे वितरित करण्यात आले, याची माहितीही संबंधित अधिकाऱ्यांना बैठकीत देता आली नाही. या प्रकाराची गंभीर दखल घेत पालकमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश अतिरिक्त जिल्हाधिकारी शैलेंद्र हिंगे यांना दिले. चारा उत्पादनासाठी अधिक गांभीर्याने नियोजन करण्याची गरज असून, पुढील सहा महिन्यांचा स्वतंत्र आराखडा तयार करण्याचे निर्देशही विखे पाटील यांनी दिले.

वीज वितरण कंपनीने रोहित्रे बदलण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. तसेच संध्याकाळच्या भारनियमनाचे प्रमाण कमी करण्यात आले असून, पुढील एका महिन्यात वीजपुरवठ्याशी संबंधित सर्व प्रश्न निकाली काढावेत, अशा सूचना पालकमंत्र्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

प्रवरा नदीपात्रात मोठ्या प्रमाणात प्रदूषित पाणी सोडले जात असल्याने नदीकाठच्या गावांबरोबरच काही पाणीपुरवठा योजनांवरही त्याचा परिणाम होत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी बैठकीत केल्या. संगमनेर नगरपालिकेकडून या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याचेही निदर्शनास आणण्यात आले.

या पार्श्वभूमीवर पालकमंत्री विखे पाटील यांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांना तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. टंचाईच्या काळात टँकरद्वारे पुरविण्यात येणाऱ्या पाण्यासाठी फिल्टरची व्यवस्था करण्याचेही त्यांनी सांगितले.

निळवंडे धरणातून तीन आवर्तने उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. तालुक्यातील २१० गाव तलाव, पाझर तलाव व साठवण तलाव भरून देण्यात आल्याने अनेक गावांना आणि शेतकऱ्यांना फायदा झाला.

साकूर परिसरातील १४ गावे आणि २२ पाझर तलाव भरण्यासाठी प्रस्तावित उपसा सिंचन योजनेसाठी २२५ कोटी रुपयांच्या निधीच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता मिळणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. भोजापूर कालव्याच्या पूरचारीसाठी ४४ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून, नदीजोड प्रकल्पात या प्रकल्पाचा समावेश झाल्याने निधीची अडचण भासणार नाही. सध्याची परिस्थिती लक्षात घेता अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन पातळीवर मर्यादित न राहता प्रत्यक्ष गावांमध्ये जाऊन नागरिकांच्या अडचणी समजून घ्याव्यात. पशुधनासाठी चारा, पिण्याचे पाणी, पीक नुकसान, वीजपुरवठा आणि जलजीवन मिशनच्या कामांसंदर्भातील तक्रारी गांभीर्याने सोडवाव्यात.

### पंचनाम्यांतून एकही शेतकरी वंचित राहू नये - आ. खताळ

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. या कठीण परिस्थितीत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करताना एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी केली. पंचनाम्यांच्या याद्या केवळ ग्रामपंचायतीच्या फलकावर न लावता सोशल मीडिया आणि व्हॉट्सपच्या माध्यमातूनही गावकऱ्यांपर्यंत पोहोचवाव्यात. मागील वर्षी पीक विम्यापासून काही शेतकरी वंचित राहिल्याच्या तक्रारी होत्या. यंदा त्याची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी पंचनामे पूर्ण झाल्यानंतर लाभार्थी याद्या सर्व माध्यमांतून प्रसिद्ध कराव्यात. नुकसान झाले असूनही एखादा शेतकरी यादीतून वंचित राहिल्यास त्याला तक्रार निवारणाची संधी द्यावी, असेही खताळ यांनी सांगितले.अधिकारी–कर्मचाऱ्यांकडून हलगर्जीपणा किंवा निष्काळजीपणा झाल्यास कठोर कारवाईची आवश्यकता भासल्यास शासनाकडे पाठपुरावा करू, असा इशाराही आमदार खताळ यांनी दिला.

# संगमनेर बायपासवर अपघात

## कंटेनरला बुलेटची धडक, युवकाचा मृत्यू



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : शहरालगतच्या नाशिक-पुणे बायपासवरील घुलेवाडी हद्दीत रविवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास बुलेट आणि कंटेनरच्या भीषण अपघातात एका युवकाचा मृत्यू झाला आहे. या अपघातामुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, चक १२ तठ २४८१ क्रमांकाची बुलेट नाशिकच्या दिशेने भरधाव वेगाने जात होती. यावेळी पुढे जाणाऱ्या गक ०२ इङ ३३३९ क्रमांकाच्या कंटेनरला बुलेटने पाठीमागून जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की कंटेनरचा टायर फुटला. अपघाताचा जोरदार आवाज झाल्याने आसपासच्या नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अपघातात बुलेटस्वार युवकाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. नागरिकांनी त्याला तातडीने उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, घुलेवाडी येथे दाखल केले. मात्र, प्राथमिक माहितीनुसार युवकाचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले आहे.

अपघाताची ही घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, त्यामध्ये बुलेट कंटेनरला जोरदार धडकताना दिसत असल्याची माहिती आहे. दरम्यान, मृत युवक राजस्थान येथील रहिवासी असल्याचे समोर आले आहे. त्याची ओळख शेखावत गजेंद्र सिंग रा, राजस्थान अशी प्राथमिक स्वरूपात समोर आली आहे.

या अपघाताची माहिती मिळताच संबंधित पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, पुढील तपास सुरू आहे. अपघात नेमका कशामुळे झाला, याचा तपास पोलीस करीत आहेत.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

# आदिवासी विद्यार्थ्यांवरील कारवाईचा बाळासाहेब थोरातांकडून निषेध

## 'न्याय मागणे, प्रश्न विचारणे आणि आंदोलन करणे गुन्हा आहे का?'; सरकारला सवाल

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर - आपल्या न्याय्य मागण्यांसाठी नाशिकहून पायी मुंबईपर्यंत आलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांवर पोलिसांकडून करण्यात येत असलेल्या कारवाईवर ज्येष्ठ काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी तीव्र आक्षेप नोंदविला आहे. आदिवासी बांधवांनी आपल्या न्याय्य हक्कांसाठी आंदोलन करणे हा गुन्हा आहे का? सरकार नेमके स्वतःला काय समजते, असा सवाल थोरात यांनी उपस्थित केला.

नाशिकहून पायी मुंबईत दाखल झालेले आदिवासी विद्यार्थी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या टिळक भवन येथील मुख्यालयात मुक्कामी थांबले होते. मात्र, मध्यरात्रीपासून पोलिसांनी टिळक भवनमध्ये प्रवेश करून विद्यार्थ्यांवर दबाव निर्माण केला, त्यांना धमकावले तसेच अटकेची कारवाई केली जात असल्याचा आरोप थोरात यांनी केला आहे.

ही बाब गंभीर असून, अशा प्रकारची कारवाई निषेधार्ह असल्याचे थोरात यांनी म्हटले आहे. आपल्या हक्कांसाठी शांततेच्या मार्गाने आवाज उठविणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांशी सरकारने संवाद साधणे गरजेचे आहे. त्यांच्या मागण्या आणि समस्या समजून घेण्याऐवजी पोलीस बळाचा वापर करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न का केला जात आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.



'लोकशाहीत प्रश्न विचारणे गुन्हा नाही, न्याय मागणे गुन्हा नाही आणि आंदोलन करणेही गुन्हा नाही,' असे स्पष्ट करत थोरात यांनी आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत सरकारने संवेदनशीलतेने भूमिका घेण्याची मागणी केली.

महाराष्ट्र हा कायदा, लोकशाही आणि सामाजिक न्यायाचा सन्मान करणारा प्रदेश आहे. अशा परिस्थितीत आपल्या न्याय्य मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याऐवजी त्यांच्यावर अटकेची कारवाई करणे योग्य आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

दरम्यान, सरकारच्या या भूमिकेचा निषेध करत आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांच्या लढ्यात काँग्रेस त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी असल्याचे बाळासाहेब थोरात यांनी स्पष्ट केले.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
※ कर्ज रक्कम वाढ । ※ कर्ज व्याजदर कमी । ※ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल... सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
- सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25